Clarification

a. RIU recommendation letter शासकीय ई-मेल द्वारे प्राप्त झाले असल्याने ग्राह्य धरण्यात आले आहे.

b. स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावली नुसार सद्य स्थितीत grant agreement stamp पेपर वर करणेबाबत बंधनकारक करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे सिबिओ मार्फत सादर करण्यात आलेले मुळ agreement या कार्यालय मार्फत स्वीकारण्यात आलेले आहे.

c. प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष (PCMU) मार्फत Grant Agreement चे विहित नमुन्यात देण्यात येतात. त्यानुसार सिबिओ कडून अनुदान करारनामा करण्यात येतो. सदर करारनाम्या मध्ये आवश्यक त्या ठिकाणी रिकाम्या जागा भरून सिबिओ अनुदान करारनामा टाईप करून स्वाक्षरीसाठी बँकेत व तदनंतर जिल्ह्याच्या प्रकल्प संचालक आत्मा यांच्या कडे पाठवले जातात. त्यामुळे बऱ्याच वेळा अनुदान करारनामा झाल्याची तारीख प्रत्यक्ष प्रकल्प संचालक यांचे स्वाक्षरी दिवशीची टाकणेसाठी नंतर हाताने टाकण्यात येते.

d. स्मार्टप्रकल्पाच्या वित्तीय नियमावलीनुसार प्रथम हप्ता वितरीत करताना आवश्यक कागदपत्रांच्या चेक लिस्ट मध्ये सदर बाब आवश्यक नाही. परंतु दुसरा हप्ता वितरणा वेळीस सदर बाबीची पूर्तता करण्यात येईल.

e. प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष (PCMU) मार्फत Grant Agreement चे जे विहित नमुने देण्यात आले होते त्याच नमुन्यांमध्ये Grant Agreement करणे बंधनकारक असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

f. स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावलीनुसार प्रथम हप्ता वितरीत करताना आवश्यक कागदपत्रांच्या चेक लिस्ट मध्ये सदर बाब समाविष्ट नसल्याने अशा प्रकारचे Resolution घेण्यात आलेले नाही.

g. ई-मेल द्वारे प्राप्त प्रमाणपत्र सिबिओ अनुदान नस्तीस जोडण्यात आले आहे.

m. सदर बाब RIU पुणे यांच्याशी निगडीत आहे. याबाबीचा अनुदान वितरणावर कोणताही परिणाम पडत नाही.

n. सिबिओस उप प्रकल्प मंजुरी आदेश दिल्यानंतर सदर सिबिओ आपले उपप्रकल्पास कर्ज मिळणेसाठी प्रस्ताव बँकेत सादर करतात. बँकेकडून आवश्यक कागद पत्रांची पूर्तता झालेनंतर बँक अधिकाऱ्या मार्फत क्षेत्रीय भेट देऊन सदर प्रकरण प्रादेशिक/ झोनल कार्यालयास मंजुरीसाठी पाठवले जाते. झोनल कार्यालयामार्फत देखील सदर प्रकरणाची छाननी व आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर मंजुरी देण्यात येते व त्यानंतर सिबिओ स्वहिस्सा उभारणी करून अनुदान मागणीचा प्रस्ताव जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करतात. जिल्हा अंमलबजावणी कक्षा मार्फत विभागिय अंमलबजावणी कार्यालयास व त्यानंतर प्रकल्प अंमलबजावणी कार्यालयास प्रस्ताव सादर होतो. प्रकल्प अंमलबजावणी कक्षस्तरावर आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर अनुदान वितरणाची कार्यवाही केली जाते. यासंपूर्ण प्रक्रियेस बराचसा कालावधी लागतो.स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावली नुसार उपप्रकल्प मंजुरी नंतर अनुदान वितरीत करणे साठी कोणत्या हि स्वरुपाचे कालमर्यादेची बंधन देण्यात आलेले नाही.